महाराष्ट्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेले वयोवृध्द खेळाडू तसेच किताब प्राप्त कुस्तीगीरांना देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक राक्रीपु- ३१२२ /प्र.क्र. ४९/क्रीयुसे -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ४ मार्च, २०२४.

वाचा

१. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्र. सेनिवे-१०९१/प्र.क्र.८२/क्रीयुसे-१, दि.१० जून, १९९३,
२. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीधो-१०९७/प्र.क्र.४०३/क्रीयुसे-१, दि. ०५ फेब्रुवारी, १९९८
३. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०००/प्र.क्र.१४४/क्रीयुसे-१, दि.८ मे, २००१,
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. क्रीडायो-२००८/(प्र.क्र.२१२/०८) क्रीयुसे-१, दि. ०६ मार्च, २०१०,
५. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. क्रीडायो-२००९/(प्र.क्र.२६८/०९) क्रीयुसे-१, दि. १७ एप्रिल, २०१०
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. क्रीडायो-२०१२/(प्र.क्र.६४/१२) क्रीयुसे-२, दि. २१ डिसेंबर,२०१२,
७. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा,पुणे यांचे पत्र क्र. ववृखेमा/मा.रक्कम वाढ प्रस्ताव/मान्यता/ २०२३-२४/का-६, २६२१/दि. २३/०८/२०२३.

प्रस्तावना

राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन देण्याची योजना प्रथमतः उपरोक्त दिनांक १० जून, १९९३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानंतर दिनांक ५ फेब्रुवारी, १९९८ च्या शासन निर्णयान्वये मानधनात वाढ करण्यात आली असून, कुस्ती या खेळामध्ये "हिंद केसरी", "रूस्तमे हिंद", "महान भारत केसरी" व "भारत केसरी" हे किताब मिळविलेल्या कुस्तीगीरांच्या मानधनात दिनांक ८ मे, २००१ च्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आली असून दिनांक ७ मे, २००७ च्या शासन निर्णयान्वये वयोवृध्द खेळाडूंसाठी मानधन देण्यासाठी घालण्यात आलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.१.०० लाख पर्यन्त वाढविण्यात आली आहे. तसेच दिनांक ६ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र केसरी" या किताबाचा मानधन योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. तदनंतर दिनांक १७ एप्रिल, २०१० च्या शासन निर्णयान्वये कुस्तीगीरांच्या मानधनात वाढ करण्यात आली व अंतिमतः उपरोक्त. दिनांक २१डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये कुस्तीगीरांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. दरम्यान झालेला दीर्घ कालावधी विचारात घेवून राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर

अतुलनिय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडू तसेच किताब प्राप्त कुस्तीगीरांना देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

सदर योजनेच्या लाभाकरिता खेळाडूंची कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा रू.१.०० लक्ष वरून कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा रू.२.०० लक्ष करण्यात येत असून राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनिय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडू तसेच किताब प्राप्त कुस्तीगीरांना पुढीलप्रमाणे सुधारित मासिक मानधन शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे

अ.क्र.	खेळाडू स्तर	प्रचलित शा.नि. दि.२१.१२.२०१२ नुसार मानधन	सुधारित दराने प्रस्तावित मानधनाची रक्कम
१	२.		३
१	राष्ट्रीय स्तर	२५००/-	७५००/-
२	आंतरराष्ट्रीय स्तर		
	अ) ऑलिंपिक/ जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा	६०००/-	१५,०००/-
	ब)आशियाई अजिंक्यपद/ एशियन गेम्स/ राष्ट्रकुल/ इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धा	४०००/-	१०,०००/-
	अर्जून पुरस्कार	६०००/-	१५,०००/-
३	हिंद केसरी	६०००/-	१५,०००/-
४	रूस्तमे हिंद केसरी	६०००/-	१५,०००/-
५	भारत केसरी	६०००/-	१५,०००/-
६	महान भारत केसरी	६०००/-	१५,०००/-
७	महाराष्ट्र केसरी	६०००/-	१५,०००/-

३. हा शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र.३१/२०२३/व्यय-५, दिनांक ०३/०१/२०२३ नुसार त्या विभागांनी दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात आहे.

४. यावर होणारा खर्च "२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४-क्रीडा व खेळ (०८)(०२) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनिय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन (२२०४ १६५८)-३१

सहाय्यक अनुदाने, योजनेतर" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखालील मंजूर तरतूदीमधून मागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३०४१७०४०६४२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL SURYAKANT HANJE

Digitally signed by SUNIL SURYAKANT HANJE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=b52de42797ba0b88d4615daa9566ad8fa49d5063795020 8576d69ab9dba313a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=345A2816550FE595955B31526C8E1A31863F6F9D C898D91E4543436BE8B73FDA, cn=SUNIL SURYAKANT HANJE
Date: 2024.03.04 17:13:16 +05'30'

(सुनिल हंजे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा.राज्यपाल,महाराष्ट्र राज्य.

२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.

३. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.

४. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन , मुंबई

५. मा. सभापती / उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन , मुंबई

६.मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

७.मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.

८. मा. राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

९. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.

१०. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

११ .आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,

१२. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,

१३. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर

१४ .अधिदान व लेखाधिकारी, मुंबई(क्रीडा संचालनालयामार्फत) .

१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)

१६ .वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे(क्रीडा संचालनालयामार्फत) .

१७ .लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, (क्रीडा संचालनालयामार्फत)

१८ .सर्व उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत),

१९ .वित्त विभाग व्यय ५- /अर्थ -८ , नियोजन विभाग (का. १४७१) मंत्रालय मुंबई,

२० .कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,

२१. निवड नस्ती (क्रीयुसे-२)